## देशातील सर्वाधिक रुंद बोगदा तयार

# ‘समृद्धी’च्या १४व्या टप्प्याचे काम पूर्ण



### बोगद्यामध्ये दूरध्वनी, इंटरनेटची सुविधा

७.७८ किमी लांबीच्या तीनपदरी दोन बोगद्यांची निर्मिती करण्यात आली आहे. या बोगद्यात दर १५० मीटरच्या अंतरावर दूरध्वनी, ३० मीटर अंतरावर स्पीकर, इंटरनेट, सीसीटीव्ही, वाहतूक नियंत्रण प्रणाली, रेडिओ कम्युनिकेशन, आग प्रतिबंधक यंत्रणा, स्वयंचलित पाणी फवारणी, पाण्याचा निचरा होण्यासाठी जलनिस्सारण वाहिनी आदी सुविधा उपलब्ध आहेत.

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** नाशिकमधील पिंपरी सदरोद्दिन ते ठाण्यातील वशाळा बुद्रुक या समृद्धी महामार्गावरील १३.१ किमी लांबीच्या १४ व्या टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे. या टप्प्यात १७.६ मीटर रुंद व ७.७८ किमी लांबीचा बोगदा असून हा देशातील सर्वाधिक रुंद व राज्यातील सर्वात लांब बोगदा आहे.

स्व. बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाचे १३ टप्पे पूर्ण झाले आहेत. महामार्गाचा नागपूर ते शिर्डी असा एकूण ५२० किमीचा टप्पा मे २०२२ मध्ये वाहतुकीसाठी खुला झाला. त्यानंतर शिर्डी ते भारवीर हा टप्पादेखील सुरू झाला. अत्यंत आव्हानात्मक भौगोलिक व नैसर्गिक परिस्थितीवर मात करत अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने पिंपरी सदरोद्दिन ते वशाळा बुद्रुक हा १३.१ किलोमीटरचा अवघड टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण झाला आहे. यात ८ किमीचा बोगदा, २ किमीचा पुल आणि ३ किमीच्या रस्त्याचा समावेश आहे. या मार्गादरम्यान दोन पूल बांधण्यात आले असून एकाची लांबी ९१० मीटर , तर दुसऱ्याची लांबी १२९५ मीटर आहे. १२९५ मीटर लांबी असलेल्या पुलाची उंची ६० मीटर इतकी असून हा समृद्धी महामार्गावरील सर्वात उंच पूल आहे. पावसाचे पाणी बोगद्यात शिरू नये, यासाठी २०० मीटरपर्यंतच्या शेड टनेलची उभारणी करण्यात आली आहे. मुदतीपेक्षा ३ महिने अगोदर या टप्प्याचे बांधकाम पूर्ण झाले आहे. जंगल आणि डोंगरातून एनएटीएम प्रणालीचा वापर करत केवळ दोन वर्षांच्या कालावधीत हे पॅकेज पूर्ण करण्यात आल्याचे ॲफकॉन्स इंफ्रास्ट्रक्चरचे प्रकल्प व्यवस्थापक शेखर दास यांनी सांगितले.